PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. १७.१२.२०१४

<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>

## पार्ले महोत्सवाचे १५व्या वर्षात दमदार पदार्पण
## उद्घाटन सोहळ्यास मुख्यमंत्र्यांची उपस्थिती लाभणार

मुंबई - विलेपार्लेच्या सांस्कृतिक विश्वातील मानबिंदू ठरलेल्या पार्ले महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री मान. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे तसेच खासदार पूनम महाजन हेदेखील उपस्थित राहणार आहेत. पार्ले महोत्सवाचे हे १५ वर्ष असून त्याचा उद्घाटन सोहळा रविवार दि. २१ डिसेंबर २०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता दुभाषी मैदानावर होणार आहे. आमदार ॲड. पराग अळवणी हे आपल्या तब्बल एक हजार कार्यकर्त्यांच्या मदतीने सातत्याने हा कला-संस्कृती-क्रीडा यांचा त्रिवेणी संगम घडवून आणतात.

या महोत्सवाच्या उद्घाटनाचे मुख्य आकर्षण म्हणजे ऱ्हीदमिक व दीप योगा तसेच पंचमहाभूतांवर आधारित नृत्याविष्कार असणार आहे. समीर आणि आर्श तन्ना यांचा ग्रुप हे नृत्य सादर करणार आहे. भारताचे पंतप्रधान मान. श्री. नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नाने नुकताच २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून युनोतर्फे जाहीर करण्यात आला आहे. भारतीय संस्कृतीतील हा प्राचीन प्रकार जनसामान्यात रूजविण्याची सुरूवात या महोत्सवातून होणार आहे.  यातील ऱ्हीदमिक योगाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेला असून त्याचे प्रथमच या सोहळ्यात सादरीकरण होणार आहे.

दहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात मुंबईतीलच नव्हे तर राज्यातून आणि इतर राज्यांतूनही स्पर्धक सहभागी होत असतात. गेल्यावर्षी तर जपान, अर्जेंटिना, लंडन येथूनही स्पर्धक आले होते. यावर्षीही आंतरराष्ट्रीय स्पर्धकांचा समावेश असेल असा विश्वास व्यक्त करताना ३० हजारपेक्षा अधिक स्पर्धक विविध ४१ कला-क्रीडा प्रकारांत सहभागी होतील असा आयोजक ॲड. पराग अळवणी यांचा दावा आहे. विशेष म्हणजे या महोत्सवात तान्ह्या बाळापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंतचे स्पर्धक सहभागी होत असतात. दरवर्षी दीड हजार पारितोषिके दिली जातात. मागील १४ वर्षात लाखो स्पर्धकांनी या स्पर्धांत सहभाग नोंदवून आपली कला आणि कौशल्य सादर केले आहे. बदलत्या काळाप्रमाणे या स्पर्धांच्या आयोजनात आणि उद्देशातही बदल केला जातो. यावर्षी मॅरेथॉन स्पर्धेत चित्रपट आणि दूरचित्रवाणीवरील कलाकारही सहभागी होणार आहेत. यावर्षी स्पर्धकांच्या खास आग्रहामुळे प्रथमच या महोत्सवात लघुपट स्पर्धा घेतली जाणार आहे. हे यावर्षीचे एक विशेष आकर्षण असणार आहे.

शिस्तबद्ध आयोजन-नियोजन, कार्यकर्त्यांची प्रामाणिक तळमळ व मेहनत हे या पार्ले महोत्सवाच्या यशस्वीतेचे गमक आहे. कार्यकर्त्यांमुळेच निकोप वातावरणात या स्पर्धा पार पडत असतात. अनेक स्पर्धांमध्ये नावीन्य आणल्यामुळे स्पर्धकसंख्या अपेक्षेपेक्षा वाढली आहे, असे महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी म्हटले आहे.  १५व्या पार्ले महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी भाजपा कार्यालय, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे किंवा २६१७७१२५/२६१३६५१३ येथे संपर्क करावा. www.parlemahotsav.com व फेसबूक पेजवरही माहिती घेता येईल.

---

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.